# मॅडम तुसॉद




लंडनच्या गोष्टीत आज आपण जाणार आहोत एका मजेदार ठिकाणी. .आपण आत्ता बेकर स्ट्रीट ट्यूब स्टेशनच्या बाहेर आहोत समोरच आपल्याला दिसतोय तो आहे सुप्रसिद्ध डिटेक्टिव्ह शरलॉक होम्सचा पुतळा. आणि डावीकडे पाहिलं तर दिसतोय एक हिरवा डोम.त्याच्या खाली दिसते लोकांची भली मोठी रांग. जगभरातून आलेली माणसं उन्हात,पावसात, अगदी लंडनच्या बोच-याथंडीत या रांगेत उभे राहून या डोममधे जाण्यासाठी उत्सुक आहेत...अगदी आपल्यासारखी .कशासाठी बरं ? मादाम तुसॉद वॅक्स म्युझियमला..अर्थात मेणाच्या कलाकृतींचं प्रदर्शन पाहण्यासाठी. चला तर मग..पाहूया हे म्युझियम

आत शिरल्यावर प्रथम आपण येतो एका मोठ्या हॉलमधे आणि सुरुवातीलाच दिसतात आपले सर्व लोकप्रिय भारतीय सिने कलाकार..काही लोकं त्यांना पाहून क्षणभर गोंधळून जातात पण निट पाहिलं की कळतं की ते आहेत मेणाचे पुतळे. अमिताभ बच्चन, माधुरी दिक्षित अशा भारतीय कलाकारांप्रमाणे जगभरातील अनेक कलाकारांचे मेणाचे पुतळे

# मॅडम तुसॉद

इथे करुन ठेवले आहेत. त्यात चार्ली चॅप्लिन ,मेर्लीन मन्रो इत्यादीं थोर व्यक्तिमत्व पाहता येतात. काही पुतळे इतके हुबेहूब जमले आहेत की आपल्याला ती  खरोखरची माणसं वाटतात. सचिन तेंडुलकरसारखे  जगप्रसिद्ध क्रिकेटीअर्स, फुटबॉलपटू, आइन्स्टाइन ,न्यूटन सारखे शास्त्रज्ञ इथे मेणात घडवून ठेवले आहेत.शेक्सपियर,ऑस्कर वाईल्डसारखे नाटककार, लेखक यांचेही मेणाचे पुतळे पाहायला मिळतात. चर्चिल,महात्मा गांधी यांसारखे राजकीय पुढारी इतकंच कशाला अगदी ब्रिटिश रॉयल फॅमिलीचेसुद्धा पुतळे आहेत -त्यानंतर लागतात ते म्हणजे चेंबर ऑफ हॉरर्स आणि स्पिरिट ऑफ लंडन हे दोन मजेदार स्टॉप्स -अंधारवाटा ,क्रूर चेहरे,गूढ संगीत असं एखाद्या हॉरर फिल्म मधलं  वातावरण अनुभवायचं असेल तर चेंबर ऑफ हॉरर्स पाहायला हवं -तर जुन्या लंडनची सफर करायची असेल तर स्पिरिट ऑफ लंडन ही राईड तर चुकवू  नये अशीच -एखाद्या टाईम कॅप्सूलप्रमाणे लंडनच्या प्रसिद्ध ब्लॅक कॅब मध्ये बसवून अवघ्या पाच सात मिनिटात ही राईड आपल्याला जुन्या लंडनच्या वातावरणात घेऊन जाते--.तर शेवटी असणारा 4d वर्चुअल रियालिटी शो प्रदर्शनाची मजा आणखीनच वाढवून जातो.

या मजेदार प्रदर्शनाची सुरुवात केली मरी तुसॉद यांनी 1835 साली. मूळच्या फ्रेंच असणाऱ्या मरी तुसॉद यांचा जन्म झाला  1761साली फ्रान्समधील स्ट्रासबोर्ग येथे. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षापासून मरी तुसॉद यांनी या कलेतलं प्रशिक्षण आपल्या काकांकडून म्हणजेच डॉक्टर फिलीप यांच्या कडून घेतलं. वयाच्या सतराव्या वर्षी आपल्या स्वतंत्र कलाकृतींना त्यांनी  सुरुवात केली.पुढे फ्रेंच राज्यक्रांतीला सुरुवात झाली .त्या काळात क्रांतिकारकांना मेणाचे मुखवटे करून द्यायचं काम त्यांच्याकडे आलं.काही काळ त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.त्यातून कशीबशी सुटका करून त्या लंडनला आल्या आणि बेकर स्ट्रीट बाजार या ठिकाणी आपलं छोटेखानी प्रदर्शन वजा दुकान त्यांनी थाटलं. काही वर्षातच  मॅडम तुसॉदस वॅक्स म्युझियम या नावाने मेरीलीबोन स्ट्रीटवर या प्रदर्शनाची सुरुवात झाली-तेव्हापासून लंडनच नव्हे तर ॲम्स्टरडॅम,लास वेगास, सिंगापूर,हॉंगकॉंग अशा जगभरात अनेक ठिकाणी या म्युझियमच्या शाखा उघडल्या. जवळपास दोनशे वर्षाची परंपरा लाभलेले हे प्रदर्शन पाहण्यापूर्वी उत्सुक असलेले लोकांचे  चेहरे बाहेर येताना आनंदित असतात.असा आमचा गेल्या अनेक वर्षांचा अनुभव आहे.आम्ही पाहिलंय--- तुम्हीसुद्धा लंडन  भेटीत जगातलं पहिलं मॅडम तुसॉदस वॅक्स म्युझियम पाहायला विसरू नका.